दै. पुढारी, दि. १७ जानेवारी १९९० पान सहा

# शिक्षणमहर्षी व्ही. टी. पाटील यांची मुलाखत

# चांगले संस्कार घडविणारे शिक्षण हवे

**शिक्षणमहर्षी व्ही. टी. पाटील यांचा नवती महोत्सव सत्कार समारंभ आज संपन्न होत आहे. त्या निमित्ताने दै. 'पुढारी'ला त्यांनी दिलेली खास मुलाखत.**

**'आजची शिक्षणपद्धती केवळ पुस्तकी आणि ' परीक्षाकेंद्रित अशी झाली आहे. प्राथमिक शाळेपासून ते थेट पदवीपर्यंत विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडविणारे शिक्षण देण्याची आज गरज आहे' असे विचार ताराराणी विद्यापीठाचे, संस्थापक, शिक्षणमहर्षी व्ही. टी. पाटील यांनी 'पुढारी'शी बोलताना मांडले.**



व्ही.टी. पाटील

आजच्या शिक्षण संस्था म्हणजे पैसे कमविणारी दुकाने आहेत, अशी टीका काही मंडळी करतात. या टीकेबद्दल आपले मत काय असे विचारता व्ही. टी. पाटील म्हणाले की, काही शिक्षण संस्थांच्या बाबतीत ही टीका रास्त अशी आहे.

## प्रासंगिक

बोगस मार्कलिस्ट, दाखले, विद्यापीठाच्या प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकरण आणि गुणपत्रिकेत खाडाखोड करून वैद्यकीय शाखेला प्रवेश घेणे इत्यादी नुकत्याच घडलेल्या प्रकरणाबाबत विचारले असता पाटील म्हणाले की, 'हे सारे प्रकार गैर आणि शैक्षणिक क्षेत्राला काळीमा फासणारे आहेत.

पुस्तकी शिक्षण पूर्णपणे टाकून देऊन चालणार नाही. पुस्तकी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना धंदेवाईक शिक्षणही दिले पाहिजे, असेही ते म्हणाले.

खासगी शिकवण्यांबाबत विचारले असता ते म्हणाले की, "खासगी शिकवण्यांकडे विद्यार्थी वळण्यामागे काही कारणे आहेत. शैक्षणिक संस्थांमधून मिळणारे शिक्षण हे समजत नाही, चांगले नाही, असा भ्रम विद्यार्थी आणि पालकांचा झाला आहे. त्यामुळे अशा खासगी शिकवण्यांचे वर्ग वाढले.

राजकारणाविषयी विचारले असता ते म्हणाले, 'सार्वजनिक पैसा देशासाठीच खर्च झाला पाहिजे. ही भावना दृढ झालेली नाही. 'आज देशासमोर पंजाब, काश्मीर यासारखे मोठे प्रश्न आवासून उभे आहेत. पंजाबची स्थिती तर इतकी बिकट झालेली आहे की प्राप्त परिस्थितीत हा प्रश्न कोणीच सोडवू शकणार नाही. देशात वाढत चाललेल्या दहशतवादी कारवायांना सरकारचे दुबळे धोरणच कारणीभूत आहे. दहशतवादी धोरण स्वीकारले की, आपला कार्यभार उरकतो हे दहशतवाद्यांना पटले आहे. गृहमंत्री मुफ्ती महंमद सैद यांची कन्या डॉ. रुबिया सैद हिचे अपहरण करून दहशतवाद्यांनी पाच-सहा कट्टर दहशतवादी सोडवून घेतले. सरकारच्या दुबळ्या धोरणाने दहशतवाद्यांचा विजय झाला.

देशात समान नागरी कायदा लागू करण्यावाचून पर्याय राहिलेला नाही, हे सांगताना ते म्हणाले की, प्रत्येक देशात अशा प्रकारचा कायदा आहे. मग भारतातच असा कायदा का नको? हा कायदा जर लागू केला नाही तर आणखी पन्नास वर्षांनी हा भारत 'हिंदुस्थान' राहणार नाही. हिंदुत्ववादाबद्दल विचारले असता ते म्हणाले, हिंदुत्ववादाचा पुरस्कार करणारे बाळासाहेब ठाकरे यांची धोरणे मला शंभर टक्के मान्य आहेत. देशाचे हिंदुत्व टिकविण्यासाठी ठाकरे निर्भीडपणाने, तळमळीने आज प्रयत्न करतात. देशाला आज हिंदुत्वाची गरज आहे हे त्यांना लपवायचे नाही. बाळासाहेब ठाकरे यांना जातीयवादी म्हटले जाते? असे विचारता ते म्हणाले, 'हिंदुत्व सिद्ध करण्यामध्ये कुठला आलाय जातीयवाद. भारतात मुसलमान राहू नयेत असे ठाकरेंचे म्हणणे नाही. पण ते (मुस्लीम) भारतात राहून भारतविरोधी कारवाया करीत असतील त्यांना विरोध केला म्हणून बिघडले कुठे?

**भारत चव्हाण**

## मदन मोहन लोहिया यांचा आज मृत्युंजयी महोत्सव



कोल्हापूर, ता. १७—सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक कार्यामध्ये केलेल्या थोर सेवेचा गौरव म्हणून मदनमोहन लोहिया, मृत्युंजयी महोत्सव, नागरी सत्कार समितीच्या वतीने उद्या गुरूवार ता. १८ रोजी स. ९ वा ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणात मदनमोहन लोहिया यांचा प्रख्यात नाटककार वसंत कानेटकर यांच्या हस्ते सत्कार समारंभ आयोजित केला आहे. या नागरी

## शिक्षण महर्षी व्ही. टी. पाटील यांचा नवती महोत्सव समारंभ आज

कोल्हापूर, दि. १६ शिक्षणमहर्षी व्ही.टी. पाटील यांच्या नवती महोत्सवानिमित्त येथील नागरी सत्कार समितीच्यावतीने त्यांचा गौरव समारंभ आयोजिण्यात आला आहे. ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणात बुधवार दि. १७ ला सकाळी ९ वाजता होणाऱ्या या समारंभाचे प्रमुख पाहुणे थोर विचारवंत यशवंतरावजी मोहिते आहेत.